# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (शिक्षण विभाग)

E-mail ID - education.nmc@gmail.com Landline No.0712-2567028

जा.क्र.3635 / शि.वि. / 2017 दि.27 / 01 / 2017

**प्रती,**

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य.शाळा,
म.न.पा. नागपूर.

**विषय : दि.30.01.17 रोजी सर्व मनपा व खाजगी शाळांमध्ये स्पर्श लेप्रसी अवेअरनेस कॅम्पेन अंतर्गत प्रतिज्ञा, संदेश, प्रश्नावली वाचन करुन कुष्टरोगाबाबत जनजागृती करण्याबाबत.**

**संदर्भ :** मा.अपर आयुक्त(I) यांचे परिपत्रक क्र.597/अति.आ/2017, दि.24.01.17

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनानूसार नागपूर जिल्हयातील शहरी भागात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी व Anti Leprosy Day निमित्त समाजात कुष्टरोगाबाबत असलेली भिती, गैरसमज दुर होण्याकरीता, कुष्टरोगाची शास्त्रीय माहिती देण्याकरीता SPARSH जनजागृती अभियान दि.30.01.17 रोजी राबविण्यात येणार आहे.

तरी दि.30.01.17 रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पुजन करुन कुष्टरोग मुक्त भारत करण्याची प्रतिज्ञा घ्यावी. तसेच संदेश वाचन करुन कुष्टरोगाबाबत जनजागृती करावी. विद्यार्थी व पालकांना याबाबत माहिती देण्यात यावी. प्रतिज्ञापत्राचा नमुना मनपा संकेतस्थळावर देण्यात आला आहे. कार्यक्रमाचा अहवाल दि.31.01.17 रोजी शाळा निरीक्षक यांचेकडे सादर करावा.

(फारुक अहमद खान)
**शिक्षणाधिकारी**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

**प्रतिलिपी,**

1. मा.अपर आयुक्त(I), म.न.पा., नागपूर यांना माहितीस्तव सादर.
2. मा.उपायुक्त(I), म.न.पा., नागपूर यांना माहितीस्तव सादर.

# "प्रतिज्ञा"

"मी आज राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी दिना दिवशी शपथ घेतो / घेते की, कुष्ठरोगाचे संशयीत लक्षण असलेल्या व्यक्तीला जवळच्या आरोग्य केंद्रामध्ये जाण्यासाठी प्रेरित करेन. जर कुष्ठरोग असेल तर त्याला पूर्ण उपचार मिळावे त्यासाठी मदत करण्याची मी दक्षता घेईन. जर माझ्या जवळपास, माझ्या मित्रांमध्ये, शेजारी आणि समाजामध्ये कोणी कुष्ठरोगी असेल तर मी त्यांच्या / तिच्या सोबत बसणे, खाणे, फिरणे याबाबत कुठल्याही प्रकारचा भेदभाव करणार नाही.

मी अशी सुध्दा शपथ घेतो / घेते की, कुष्ठरोग पिडीत व्यक्तीबरोबर सामाजिक भेदभाव होणार नाही यासाठी मी नेहमीच प्रयत्नशील राहील.

अशीही मी शपथ घेतो / घेते की, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या **"कुष्ठरोग मुक्त भारत"** हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी नेहमी प्रयत्नशील राहील".